जा. क्र. पणन-६/ग्राहक/नोंदणी/निकष/८९
पणन संचालनालय महाराष्ट्र राज्य,
नवीन मध्यवर्ती इमारत [विस्तार],
पुणे-४११००१ दिनांक. ७ जानेवारी १९८९

विषय:- नवीन सहकारी ग्राहक संस्थांच्या नोंदणीबाबतचे सुधारित निकष.

परिपत्रक.

पणन संचालनालयाचे जा. क्र. सीओऐनएस/११/ओआरजीएन/पीएलसीबाय/१९७९ दिनांक. ३-९-१९७९ चे ग्राहक सहकारी संस्था नोंदणीबाबत या विषयाच्या संदर्भात परिपत्रक पहावे.

सहकारी ग्राहक संस्थेचे महत्व जनमानसात कळाल्यामुळे "सहकारी ग्राहक संस्था" हा एकच मार्ग आहे की, त्यायोगे बाजारातील जिवनोपयोगी वस्तुच्या किंमती स्थिर राहून ग्राहकास योग्य माल वाजवी दरामध्ये उपलब्ध होऊ शकेल व या दृढ विश्वासामुळे अधिकाधिक सहकारी ग्राहक संस्थांची नोंदणी करण्यात यावी ही मागणी सातत्याने पुढे येवू लागली. नोंदणीच्या प्रचलित निकषामुळे त्यामध्ये अडचणी जाणवू लागल्यात. यामुळे नोंदणीच्या निकषामध्ये सुधारणा करण्यासाठी सखोल अभ्यास नंतरच प्राथमिक व मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडारांच्या नोंदणीसाठी नवीन निकष तयार करण्यात आले आहेत ते या परिपत्रका सोबत जोडले आहेत. या परिपत्रकाच्या तारखे पासून सुधारित निकषा प्रमाणेच ग्राहक संस्थांच्या नोंदणी बाबत कारवाई व्हावी.

या संचालनालयाच्या जा. क्र. ग्राहक/पणन-६/१९८६/दि. २-१२-१९८६ च्या पत्राव्दारे मुंबई, पुणे, सोलापूर, कोल्हापूर आणि नागपूर या जिल्हयामध्ये नवीन प्राथमिक सहकारी ग्राहक संस्थांची पुढील आदेश येईपर्यंत नोंदणी करण्यात येऊ नये असे आदेश दिलेले होते ते ही या परिपत्रकाव्दारे रद्द करण्यात येत आहेत. परंतु ह्या जिल्हयातील ग्राहक सहकारी चळवळीचे सर्वेक्षण करुन योग्य ती कारवाई करावी असे पुन्हा जिल्हा उपनिबंधकांना निर्देश आहेत की, त्यानी हे काम फेब्रुवारी १९८९ प[illegible] संपवावे.

दि. २.१२.१९८६ च्या पत्रानंतरही वरील ५ जिल्हयामध्ये प्राथमिक सह. ग्राहक भांडारे नोंदविण्यासाठी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, यांच्या कडुन विशेष बाब म्हणून नोंदणीसाठी परवानगी देण्यात यावी अशी पत्रे आल्यावरुन ज्या संस्थांना बँकेत खाते उघडण्यासाठी /नोंदणी करण्यासाठी या संचालनालयाने परवानगी दिलेली आहे. अशा या "विशेष बाब" म्हणून परवानगी देण्यात आलेल्या प्रकरणी या परिपत्रकाच्या तारखेपर्यंत त्याची नोंदणी करण्यात आलेली नसल्यास अशा संस्थांच्या बाबतही नवीन निकषा-प्रमाणेच कारवाई करण्यात यावी.

नवीन निकषाप्रमाणेच अंमलबजावणी करतांना खालील मुद्दांचा विचार प्राधान्याने करण्यात यावा व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे किंवा नाही याची नोंदणी अधिकाऱ्याने खात्री करुन घेणे आवश्यक असून ती त्यांची जबाबदारी राहील.

..२..

अ] नियोजित संस्थेमध्ये सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींचा विहित नमुन्यामध्ये अर्ज असणे आवश्यक आहे.

ब] "सभासद" या शब्दाची व्याख्या महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० [सुधारित १९८५ ची ] यातील कलम ६ मध्ये देण्यात आलेली आहे. त्यानुसार सभासद होण्यास पात्र व्यक्ती आहेत याची खात्री करून घ्यावी म्हणजे फक्त यांनी बरूनच संस्था नोंदवू नयेत. सभासदांच्या बाबत तपासणी नंतर खात्री करून घेऊनच कारवाई करावी. नोंदणी नंतर सभासदत्वा बाबतचे नियमांचे पालन होत आहे याकरिताही वेळोवेळी पाहणी करावी की जेणे करून संस्था मध्ये व्यापाऱ्यांचा समावेश होणार नाही.

क] नियोजित संस्थेने धान्यासाठी दर्शविलेली जागा ही संस्थेतर्फे चालविण्यात येणाऱ्या व्यवहारासाठी उपयुक्त आहे किंवा नाही. बाजार पेठेत आहे किंवा नाही याची प्रत्यक्षात जागेच्या ठिकाणी जाऊन पाहणी नोंदणी अधिकाऱ्याने करून प्रकरणामध्ये स्पष्ट अभिप्राय नोंदवावा. जागेसंबंधी मालकाने केलेल्या कराराची नोंदणी करण्यासाठी घरमालकाची प्रत्यक्षात भेट घेण्यात यावी. या सर्व बाबींच्या नोंदी प्रकरणांवर असणे आवश्यक आहेत.

ड] महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम १९६० व कानू १९६१ व पोट नियमाअन्वये सर्व कायदेशिर कागदपत्राची पूर्तता नोंदणीपूर्वी केल्याची खात्री नोंदणी अधिकाऱ्याने करून घ्यावी.

ई] संचालनालयाचे दि. २.१२.१९८६ च्या पत्राव्दारे वरील ५ जिल्हयाकडुन सध्या अस्तित्वात असलेल्या सह. ग्राहक संस्था बाबतची माहिती मागविण्यात आलेली होती. परंतु अद्याप पर्यंत जिल्हा उपनिबंधक यांचेकडुन त्याची पूर्तता झालेली नाही. तेव्हा प्रत्येक संस्था नोंदणी प्रकरणाच्या वेळी दि. २.१२.१९८६ च्या पत्रामध्ये विचारणा केलेल्या मुद्यांचा परामर्श घेण्यात यावा व त्यानुसार सध्या नोंदविण्यात आलेल्या संस्थांपैकी किती संस्था चालू आहेत, किती अवसायनात घेणे आवश्यक आहे किंवा त्यांचे विलिनिकरण करणे आवश्यक आहे याची छाननी नोंदणी अधिकाऱ्याने प्रत्येक प्रकरणाच्या वेळी करून घ्यावी व तशी लेखी नोंद प्रकरणावर करून ठेवण्यात यावी.

प्राथमिक सहकारी संस्थांच्या नोंदणी संबंधीची प्रकरणे आता या पुढे कोणत्याही परिस्थितीत मध्ये पणन संचालनालयाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. काही बाबतीत मार्गदर्शन आवश्यक असल्यास तेवढेच मुद्दे संचालनालयास [illegible] करावे तथापि सक्षम नोंदणी अधिकारी यांनी प्राथमिक संस्था, नोंदण्यापूर्वी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, यांची पूर्व परवानगी घ्यावी. कोणत्याही प्रकरणी जिल्हा उपनिबंधकांच्या पूर्व परवानगी शिवाय नोंदणी बाबतची कार्यवाही करण्यात येवूनये.

संचालनालयाकडे "खास बाब म्हणून आलेली सर्व प्रकरणे अलहिदा [वेगळी] स्वतंत्ररित्य संबंधित जिल्हयांना परत पाठविण्यात येत आहेत.

..३..

निकष अंमलबजावणीत ठेवून मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था नोंदवावयाचे निकष अंमलबजावणीत ठेवून विभागीय सहनिबंधक सहकारी अधिकारी त्याने संस्था नोंदणी बाबत विभागीय सहनिबंधक सहकारी ा यांची पूर्व परवानगी घ्यावी. परंतु अस्तित्वातील प्राथमिक सहकारी ांची मध्यवर्ती सह. संस्थे मध्ये रूपांतर करण्याचा प्रस्ताव पणन संचालनालयाक- मान्य करून, झाल्या नंतरच विचारात घेण्यात यावा. एकंदरीत मध्यवर्ती ग्राहक ारी ग्राहके/संस्था नोंदविताना देखिल कोणतीही प्रकरणे या संचालनालयास "खास बाब" ून प्राथमिक्रियात घेवून येत. ठराविक मुद्यावर मार्गदर्शन आवश्यक असल्यास तेवढेच ाबाबत पणन संचालनालयाकडे संपर्क साधावा. मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था नोंदविताना अस्तित्वात असलेल्या मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्थांची पहाणी रणे अत्यावश्यक ठरते. तसेच जिल्हयातील आठव्या पंचवार्षिक योजनेत किंवा ातव्या पंचवार्षिक योजनेत राहीलेल्या दोन वर्षातील आर्थिक तरतुदही विचारात ेणे अत्यावश्यक ठरते. एकंदरीत ज्या जिल्हयामध्ये आर्थिक तरतुद आहे किंवा होण्याची शक्यता आहे अशा जिल्हयांमध्ये तरतुदींचा विचार करून संस्था नोंदणी बाबतचे निकष पूर्ण झाल्या नंतरच विचारात घेण्यात यावे. तथापि ज्या संस्था विना शासकीय अर्थपुरवठा आर्थिक सक्षम होऊ शकतील व त्यांनी त्याची लेखी हमी दिलेली आहे अशा नियोजित संस्थांच्या नोंदणीचा विचार निकष पूर्ण होत असल्यास करावा.

ग्राहक चळवळी अंतर्गत नवीन संस्था नोंदक्रियाबाबत अस्तित्वात असलेल्या संस्थावर विपरित परिणाम होणार नाही याची प्रथम दखल घेण्यात यावी. ग्राहक चळवळीला पोषक असे नवीन घटक समाविष्ट करून घेण्याबाबत विचार करून चळवळ सक्षम करावी. त्यानुसार विचार करून व विकासाच्या दृष्टीने संस्था नोंदक्रियासाठी कार्यवाही करून घ्यावी परंतु कोणत्याही परिस्थितीमध्ये निकष पूर्ण नसताना व संदर्भातील परिच्छेद मधील परिस्थितीचा विचार न करता संस्था नोंदक्रियांत घेवू नये. सोई करिता अशी पुनरावृत्ती करण्यात येत आहे की, प्रस्तावाचे निकष विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार यांच्या नोंदणीसाठी लागू नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

सही/-

[ भा. घ. पवार ]

संचालक [पणन]

महाराष्ट्र राज्य, पुणे- १

प्रति,

[ सर्व ]

१] जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, [ सर्व ] [ सस्नेह ]

२] विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१] मा. सचिव, कृषि व सहकार विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२

२] मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१.

परिशिष्ट "१"
=०=

प्राथमिक ग्राहक सहकारी ग्राहक संस्था नोंदणी बाबतचे निकष....

| अ.क्र. सहकारी ग्राहक संस्थेचा प्रकार =१= | नोंदणीसाठी असलेले सध्याचे निकष =२= | संस्था नोंदणीसाठी दि. ७.१.१९८९पासून अंमलात आणावयाचे नवीन निकष =३= |
|---|---|---|
| १] प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था:- अ] शहरी विभागासाठी | १] कार्यक्षेत्र:- कमीत कमी १०००० किंवा त्या पेक्षा जास्त लोकवस्ती असलेले गांव<br>२] सभासद संख्या:- कमीत कमी २५० सभासद व नोंदणीनंतर पुढील ३ वर्षात सभासद संख्या ५०० पर्यंत वाढवावी<br>३] भाग भांडवल:- कमीत कमी रु. ५०००/- व पुढील ३ वर्षात रु. १००००/- पर्यंत वाढवावी.<br>४] उलाढाल:- प्रथम वर्षी सुमारे रु. ४.५० लाख ते रु. ५ लाख व पुढील ३ वर्षात रु १०.०० लाख ते रु. १२.०० लाख पर्यंत वाढवावी.<br>५] जागा:- ग्राहक भांडारात स्वतःची अगर भाड्याची पुरेशी जागा असावी. | १] कार्यक्षेत्र:- कमीत कमी १०००० लोकवस्ती /महानगरपालिका असल्यास एक वार्ड/नगरपालिका असल्यास २ वार्ड अशी कार्यक्षेत्राची मर्यादा असावी.<br>२] सभासद संख्या:- कमीत कमी ५०० सभासद व पुढील ३ वर्षात १०००० पर्यंत वाढवावेत. त्यात २४ % अनु.जाती जमाती नवबौद्ध व भटक्या, विमुक्त जातींचा समावेश असावा.<br>३] भाग भांडवल:- नोंदणीच्या वेळी कमीत कमी रु. १००००/- व पुढील ३ वर्षात रु. २५०००/- पर्यंत वाढवावे.<br>४] उलाढाल:- प्रथम वर्षी सुमारे रु. ८ लाख व पुढील ३ वर्षात रु. २००००००/- पर्यंत व्हावी<br>५] जागा:- ग्राहक भांडारात स्वतःची अगर भाड्याची दुकान चालविण्यासाठी पुरेशी जागा असावी |
| २] प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था:- ब] ग्रामीण व अर्ध नागरी विभागातील प्राथमिक ग्राहक संस्था | | १] कार्यक्षेत्र:- कमीत कमी एका ठिकाणीच १०००० असावी. लोकसंख्या धरताना आसपासची ५ कि.मि. परिसरातील खेडी व वाड्या यांचा समावेश असावा. |

..२..

=४=

२] सभासद संख्या:- कमीत कमी ४०० व पुढील ३ वर्षात ७५० करावी. त्यात २४% अनुसूचित जाती जमाती व नवबौद्ध, भटक्या विमुक्त जातींचा समावेश असावा.

३] भाग भांडवल:- कमीत कमी रु.८०००/- व पुढील ३ वर्षात रु.१२०००/- पर्यंत वाढवावे.

४] उलाढाल:- प्रथम वर्षी सुमारे रु.६/ लाख व पुढील ३ वर्षात रु.८/लाख पर्यंत वाढवावे.

५] जागा:- ग्राहक भांडारात स्वत:ची अगर भाड्याची जागा दुकान चालविण्यासाठी असावी.

६] मुख्यत्वे करून नियोजित संस्था नोंदविण्यापूर्वी जर त्या भागातील प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्था/ग्राहकोपयोगी वस्तुंचे वितरण करीत असेल तर त्या ठिकाणी नियोजित संस्थेमुळे प्रचलित कृषि पतपुरवठा संस्थेच्या विकासाला बाधा येणार नाही ही खात्री नोंदणी अधिकाऱ्यांनी करून घ्यावी. तसेच ज्या कृषि पतपुरवठा सहकारी संस्था ग्राहकोपयोगी वस्तुंचे वितरण करण्यांत तयार आहेत. सक्षम आहेत अशाही ठिकाणी अशी नियोजित ग्राहक संस्था नोंदविण्यांत येऊ नये.

| =१= | =२= | =३= | =४= |
|---|---|---|---|
| २] प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था:- | क] डोंगराळ विभागत संस्था नोंदणी बाबतचे निकष. | | १] कार्यक्षेत्र:- शक्यतो आठवडा बाजाराचे गांव संस्था प्रस्तावित करण्यात यावी. विभागत कमीत कमी लोकसंख्या ७००० असावी. ही लोकसंख्या धरताना आसपासच्या ५ कि. मि. अंतरावरील खेडी व वाडया यांच्यातील लोकसंख्येचा अंतर्भाव करता येईल.<br>२] सभासद संख्या:- कमीत कमी २५० व पुढील ३ वर्षांत मध्ये ५०० असावी. त्यात २४ % अनुसुचित जाती जमाती नवबौध्द व आदिवासी भागामध्ये भटक्या जाती व विमुक्त जाती जमातींचा समावेश असावा.<br>३] भाग भांडवल:- कमीत कमी रु. ५०००/- व पुढील ३ वर्षामध्ये रु. १०००० पर्यंत वाढवावे. पर्यंत होईल असे पहावे.<br>४] उलाढाल:- प्रथम वर्षी सुमारे रु. ३.५० लाख व त्यापुढील ३ वर्षामध्ये रु. ५/- लाख पर्यंत होईल असे पहावे.<br>५] जागा:- ग्राहक भांडारास स्वतःची अगर भाडयाची दुकान चालविण्यासाठी पुरेशी जागा असावी. |
| ४] प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था:- | ड] महिला सभासदांची प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था, | | १] कार्यक्षेत्र:- कमीत कमी १०००० लोकवस्ती /महानगरपालिका असल्यास एक वार्ड/ नगर पालिका असल्यास दोन वार्ड अशी कार्यक्षेत्राची मर्यादा असावी [एकाच ठिकाणी - १०००० लोकसंख्या धरताना आसपासची ५ कि. मि. परिसरातील खेडी व वाडया यांचा समावेश असावा ].<br>२] सभासद:संख्या:- कमीत कमी ४०० नोंदणीच्या वेळी असावेत व पुढील ३ वर्षात ७५० पर्यंत सभासद वाढवावेत. त्यात २४% अनु. जाती /जमाती व भटक्या विमुक्त जातींचा समावेश असावा. नियोजित संस्थेमध्ये कमीत कमी ८० ते ८५ % महिला सभासद असणे आवश्यक आहे. |

७

=१=

=२=

=३=

५] प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था:-
ब] मागासवर्गीय सभासदांची सहकारी ग्राहक संस्था





३] भाग भांडवल:- नोंदणीच्या वेळी भाग भांडवल कमीत कमी रु. ६०००/-असावे व पुढील ३ वर्षात ते रु. १२०००/- पर्यंत वाढवावे.

४] उलाढाल:- प्रथम वर्षी सुमारे रु. ६॥ लाख व पुढील ३ वर्षात रु. ८ लाख पर्यंत वाढवावी.

५] जागा:- ग्राहक भांडारास स्वत:ची अगर भाड्याची जागा दुकान चालविण्यासाठी असावी.

१] कार्यक्षेत्र:- कमीत कमी १०००० लोकवस्ती महानगरपालिका असल्यास ऊप वार्ड नगरपालिका असल्यास दोन वार्ड [ एकाच ठिकाणी १०००० लोकवस्ती धरताना- आसपासच्या ५ कि. मि. अंतराच्या परिसरातील झोडी व वाड्या वेधील लोकसंख्येचा विचार करण्यात यावा. ]

२] सभासद संख्या:- नोंदणीच्या वेळी कमीत कमी २५० सभासद असावेत व ही संख्या पुढील ३ वर्षात ५०० पर्यंत वाढवावी. या सभासद संख्येमध्ये ८० % अगर त्यापेक्षा जास्त अनुसुचित जाती/जमाती, नवबौध्द, भटक्या विमुक्त जाती जमातीच्या सभासदांचा समावेश असावा.

३] भाग भांडवल:- नोंदणीच्या वेळी कमीत कमी रु. ५०००/- असावे व पुढील ३ वर्षात ते रु. १००००/- पर्यंत वाढवावे.

४] उलाढाल :- प्रथम वर्षी रु. २.५० लाख व पुढील ३ वर्षात रु. ५/- लाख होईल असे पहावे.

५] जागा:- ग्राहक भांडारास स्वत:ची अगर भाड्याची दुकान चालविण्यास पुरेशी जागा असावी.

परिशिष्ट "२"

=०=

मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था नोंदणी बाबतचे निकष....

=०=

| अ.क्र. मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्थेचा प्रकार | नोंदणीसाठी असलेले सध्याचे निकष | संस्था नोंदणीसाठी दि. ७.१.८९ पासून अमलात आणावयाचे नवीन निकष |
|---|---|---|
| =१= =२= | =३= | =४= |
| मध्यवर्ती सहकारी-ग्राहक भांडारे<br>१] महानगरपालिका परिसरात | १] लोकसंख्या:-५०००० किंवा त्यापेक्षा जास्त असावी.<br>२] कार्यक्षेत्र:- तालुका/जिल्हा कार्य क्षेत्र.<br>३] सभासद संख्या:- १००० सभासद असावेत व किमान २० प्राथमिक संस्था <u>संलग्न</u> असाव्यात व हीच सभासद संख्या पुढील ३ वर्षात २०००० पर्यंत वाढवावी.<br>४] भाग भांडवल-नोंदणीचे वेळी रु. २००००/- व पुढील ३ वर्षात रु. १,००लाखापर्यंत वाढवावे.<br>५] जागा:- पुरेशी जागा उपलब्ध असावी.<br>* अगर भाड्याची पुरेशी जागा उपलब्ध असावी. भाड्याची | १] लोकसंख्या:- ३ लाखात एक संस्था याप्रमाणे संस्था नोंदतांना लोकसंख्येबाबत निकष असावेत.<br>२] कार्यक्षेत्र:- ३ लाखाच्या लोकसंख्येसाठी आवश्यक असणाऱ्या वार्ड पर्यंत कार्यक्षेत्र मर्यादित असावे.<br>३] सभासद संख्या:- नोंदणी समयी कमीत कमी वैयक्तीक सभासद २५०० असावेत. तसेच ग्राहकोपयोगी व्यवसाय करणाऱ्या कमीत कमी २० प्राथमिक संस्था संलग्न असाव्यात. त्या संस्था त्यासंबंधित वार्डातील असाव्यात. वैयक्तीक सभासदामध्ये २४ % सभासद अनु. जाती, जमाती/नवबौध्द भटक्या विमुक्त जातीतील असावेत. पुढील ३ वर्षामध्ये सभासदांची संख्या ५००० पर्यंत होईल असा प्रकारची खात्री व्हावी.<br>४] भाग भांडवल:- नोंदणी समयी कमीत कमी रु. ५/-लाखापर्यंत असावे व पुढील ३ वर्षामध्ये भाग भांडवल रु. १०/-लाख पर्यंत वाढविण्याची खात्री असावी.<br>५] जागा:- भांडारात स्वतःची जागा असल्यास ती कमीत कमी ५ वर्षासाठी प्रथमतः उपलब्ध होण्याबद्दलची कागदपत्रे असावीत. |

..२..

..३..

=१= =२=

६] उलाढाल:-

=३=

मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडारे

२] नगरपालिका/नगरपरिषद विभागात

=४=

६] उलाढाल:- सुरुवातीच्या वर्षी उलाढाल कमीत कमी रु. २५/-लाख असावी. परंतू त्याची मर्यादा पुढील ३ वर्षामध्ये रु. १/-कोटी पर्यंत वाढावी अशा प्रकारची खात्री असावी.

१] लोकसंख्या:- ५०००० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असावी.

२] कार्यक्षेत्र:- उपरोक्त लोकसंख्येत मर्यादित तसेच संलग्न संस्था पुरते मर्यादित

३] सभासद संख्या:- नोंदणीच्या वेळी वैयक्तीक सभासद १५०० व किमान २० प्राथमिक ग्राहकोपयोगी व्यवसाय करणाऱ्या सहकारी संस्था संलग्न असाव्यात. व्यक्तीगत सभासदामध्ये २५ % अनुसुचित जाती, जमाती, नवबौध्द व भटक्या विमुक्त जातींचा समावेश असावा व सभासद संख्या पुढील ३ वर्षात २५०० पर्यंत वाढवावी.

४] भाग भांडवल:- नोंदणीच्या वेळी रु. १०००००/- व पुढील ३ वर्षात रु. ५४-लाखापर्यंत वाढवावे.

५] जागा:- ग्राहक भांडारास स्वत:ची अगर भाडयाची पुरेशी जागा दुकान चालविण्यासाठी उपलब्ध असावी.

६] उलाढाल:- नोंदणी वर्षी कमीत कमी उलाढाल रु. १५/- लाख होईल व पुढील ३ वर्षामध्ये उलाढाल रु. ७५/- लाख होईल अशी खात्री असावी.

10

| =१= | =२= | =३= | =४= |
|---|---|---|---|
| मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडारे | ३] सहकारी साखर कारखान्यांचे परिसरातील | | १] कार्यक्षेत्र:- साखर कारखान्याचे —<br>२] सभासद संख्या:- नोंदणीचे वेळी ३००० व किमान २० प्राथमिक ग्राहकोपयोगी वस्तुंचा व्यवसाय करणाऱ्या प्राथमिक सहकारी संस्था संलग्न असाव्यात. वैयक्तिक सभासदामध्ये २४ % अनुसूचित जाती जमाती नवबौध्द व भटक्या विमुक्त जातींचे सभासद असावेत. सभासद संख्या पुढील ३ वर्षात ६००० पर्यंत वाढवावी.<br>३] भाग भांडवल:- नोंदणीचे वेळी ६५/- लाख व पुढील ३ वर्षात रु.१०/- लाखापर्यंत वाढवावे.<br>४] जागा:- सदर ग्राहक भांडारासाठी लागणारी जागा अल्प मोबदल्यात साखर कारखान्याने द्यावी व त्यावरील बांधकाम नवीन पध्दतीने स्वत: साखर कारखान्याने करून द्यावे [ सी. ॲड पी सेलच्या विक्री नमुन्या प्रमाणे ]<br>५] उलाढाल:- सुरुवातीच्या वर्षी उलाढाल कमीत कमी रु. २५/- लाख असावी. परंतू त्याची मर्यादा पुढील ३ वर्षामध्ये रु.१/- कोटी पर्यंत वाढावी अशा प्रकारची खात्री असावी. |

प्राप्त

महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि., मुंबई च्या संचालक मंडळाच्या निवडणूक प्रक्रियेस मुदतवाढ देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**क्रमांक : सपस २०११/प्र.क्र. २४३ / २४ स,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक :- ३ जानेवारी, २०१२**

**आदेश**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६०

ज्याअर्थी, महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि., मुंबई या संस्थेच्या संचालक मंडळाची मुदत १७.२.२०१२ रोजी संपणार आहे व महाराष्ट्र विनिर्दिष्ट सहकारी संस्था समित्यांचे निवडणूक नियम १९७१ प्रमाणे महासंघाच्या संचालक मंडळाची निवडणूक घेणेचे दृष्टिने कार्यवाही करणे ही महासंघाची जबाबदारी आहे. आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि., मुंबई या संस्थेच्या संचालक मंडळाची मुदत दि. १७.२.२०१२ रोजी संपत असल्याने तत्पूर्वी मुदतीत संचालक मंडळाची निवडणूक घेणे आवश्यक आहे. परंतु दरम्यानच्या काळात राज्यात महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या यांच्या निवडणूका होणार असल्याने व माहसंघाचे संचालक मंडळाचे निवडणूकीकरिता संपूर्ण राज्यातून मतदान होत असल्यामुळे तसेच महासंघाचे सर्व सभासद हे जिल्हा परिषदा व नगरपालिका व महानगरपालिकांचे निवडणुकीमध्ये व्यस्त होणार असल्यामुळे, महासंघाने दि.१७.२.२०१२ पासून पुढील सहा महिन्यानंतर संचालक मंडळाची निवडणुक घेणेबाबत व विद्यमान संचालक मंडळास निवडणूकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मुदतवाढ देण्यास शासनास विनंती केलेली आहे व तसा ठराव संघाने संचालक मंडळ सभा दि.८.१०.२०११ रोजी पारीत केलेला आहे. आणि,

ज्याअर्थी, संघाच्या संचालक मंडळाच्या निवडणूक प्रक्रियेस मुदतवाढ देण्याबाबतची महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि., मुंबई यांची विनंती योग्य असल्याची शासनाची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, शासन, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम १५७ अन्वये शासनास प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि., मुंबई या संस्थेला अधिनियमातील कलम ७३ (१) (ब) मधील तरतुदीतून सूट देत असून उक्त संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणूक प्रक्रियेस व विद्यमान संचालक मंडळास दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२ पासून सहा महिन्यासाठी मुदतवाढ देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

सु.बा.तुंबारे

( सु. बा. तुंबारे )
अवर सचिव , महाराष्ट्र शासन
सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रति,

सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,
जिल्हाधिकारी, मुंबई,
कृषी पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र स्टेट को-ऑ.कंझ्युमर्स फेडरेशन, ८७-A, ५ वा मजला, देवराज रतनसी मार्ग, दाना बंदर, मस्जिद बंदर रोड (पूर्व), मुंबई ४०० ००९,
निवड नस्ती.

C:\May 11\GR\Sanchalak Mudatwad